Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**
416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004,
दुरध्वनी – ईपीएबीएक्स – 2609000,
www.unishivaji.ac.in

# विद्यार्थी विकास विभाग

**Dr. S. G. Ghane**
**Director, Students' Development**
**Phone – (0231) 2609175, 2609475**
**Email: dsw@unishivaji.ac.in**


संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/523 दि. 12/08/2026

प्रती,
**मा. अधिविभागप्रमुख/संचालक/समन्वयक,**
सर्व अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय : Anti Ragging Week च्या अनुषंगाने आयोजित विविध स्पर्धामध्ये सहभागी होणेबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय संदर्भात यु.जी.सी. मार्फत दि. १२ ऑगस्ट **Anti Ragging Day** हा **Anti Ragging Week** म्हणून दि. १२ ऑगस्ट ते दि. १८ ऑगस्ट, २०२६ या कालावधीत साजरा करणेबाबत कळवण्यात आले आहे. विद्यार्थ्यामध्ये Ragging विरुद्ध जाणीवजागृती वाढवणे हा याचा मुख्य उद्देश आहे व या अनुषंगाने विद्यापीठ परिसरात विविध कार्यक्रम आयोजित करण्याबाबत कळवण्यात आले आहे. त्यानुसार या विभागामार्फत पोस्टर मेकिंग स्पर्धा व रिल्स स्पर्धा आयोजित करण्यात येत आहेत.

**१. पोस्टर मेकिंग स्पर्धा दि. १४/०८/२०२६ रोजी दुपारी १२.०० ते २.३० या वेळेत संगीत व नाटयशास्त्र अधिविभागामध्ये आयोजित करण्यात येणार आहेत.**

**२. रिल्स स्पर्धेसाठी दि. १७/०८/२०२६ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत रिल्स तयार करुन विद्यार्थी विद्यार्थी विकास विभागात जमा करावयाचे आहेत.**

सोबत दोन्ही स्पर्धांची नियमावली जोडली आहे. तरी सदर दोन्ही स्पर्धेमध्ये आपल्या अधिविभागातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देण्यात यावे तसेच सदरचे पत्र विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावे व माहितीसाठी सुचना फलकावर लावावे. हि विनंती.

कळावे,

आपला विश्वासू

संचालक
विद्यार्थी विकास

सोबत : नियमावली जोडली आहे.

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## विद्यार्थी विकास विभाग
## Anti Ragging Week
## पोस्टर मेकिंग स्पर्धा नियमावली

यु.जी.सी. ने दि. १२ ऑगस्ट Anti Ragging Day हा Anti Ragging Week म्हणून दि. १२ ऑगस्ट, २०२६ ते दि १८ ऑगस्ट, २०२६ या कालावधीत साजरा करावयाचे ठरवले आहे. Ragging विरुध्द जाणीव जागृती वाढवणे हा याचा मुख्य उद्देश आहे. त्या अनुषंगाने **( Anti-Ragging / Stop Ragging / Safe Campus)** या विषयावर पोस्टर मेकिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी पोस्टर मेकिंग स्पर्धेमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी **स्पर्धेकरीता दि. १४ ऑगस्ट, २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता संगीत व नाटयशास्त्र अधिविभाग येथे उपस्थित रहावे.**

**स्पर्धेचे स्वरुप आणि अटी:**

१. सदर स्पर्धेसाठी प्रवेश विनामुल्य असेल.
२. स्पर्धेसाठी एका अधिविभागातील कितीही स्पर्धकांना भाग घेता येईल.
३. स्पर्धकास संगीत व नाटशास्त्र अधिविभाग येथे जागेवर बसून पोस्टर तयार करावयाचे आहे.
४. **पोस्टर स्पर्धेसाठी लागणारे सर्व साहित्य स्पर्धकांनी स्वत: आणावयाचे आहे.** संयोजकामार्फत फक्त कागद पुरविला जाईल.
५. पोस्टरचा आकार २२'' X १५'' असेल.
६. प्रत्येक स्पर्धकाला किमान २ तास व कमाल २.३० तासांचा वेळ दिला जाईल.
७. पोस्टरसाठी कोणत्याही प्रकारचे ऑईल, वॉटर, पेस्टल इ. रंग वापरता येतील.
८. **तज्ञांनी परीक्षण करुन ठरवलेल्या प्रथम पाच क्रमांकांनाच प्रमाणपत्र व खालीलप्रमाणे रोख रक्कम बक्षिस म्हणून देण्यात येईल.**

    प्रथम क्रमांक – रु. १,५००/–
    द्वितीय क्रमांक – रु. १,३००/–
    तृतीय क्रमांक – रु. १,०००/–
    चतुर्थ क्रमांक – रु. ७००/–
    पाचवा क्रमांक – रु. ५००/–

९. **सर्व सहभागी स्पर्धेकांना प्रमाणपत्र देण्यात येईल.**
१०. स्पर्धेत कोणत्याही शाखेचे विद्यार्थी सहभागी घेऊ शकतात.
११. स्पर्धेचा निकाल विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येईल.
१२. पोस्टर मेकिंग स्पर्धेचे परीक्षण नियुक्त परिक्षकांकडून केले जाईल.
१३. परिक्षकांचा निर्णय अंतिम राहिल.

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## विद्यार्थी विकास विभाग

## Anti Ragging Week

## रिल्स स्पर्धा नियमावली

यु.जी.सी. ने दि. १२ ऑगस्ट Anti Ragging Day हा Anti Ragging Week म्हणून दि. १२ ऑगस्ट, २०२५ ते दि १८ ऑगस्ट, २०२६ या कालावधीत साजरा करावयाचे ठरवले आहे. Ragging विरुध्द जाणीव जागृती वाढवणे हा याचा मुख्य उद्देश आहे. त्या अनुषंगाने निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी निबंध स्पर्धेमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी दि. १७ ऑगस्ट, २०२६ रोजी दुपारी ०२.०० वाजेपर्यंत विद्यार्थी विकास विभागाकडे **( Anti-Ragging / Stop Ragging / Safe Campus)** या विषयावर रिल्स तयार करुन जमा करावयाचे आहे.

**स्पर्धेचे स्वरुप आणि अटी:**

१. सदर स्पर्धेसाठी प्रवेश विनामुल्य असेल.
२. स्पर्धेसाठी एका अधिविभागातील कितीही स्पर्धकांना भाग घेता येईल.
स्पर्धेत वैयक्तिकरित्या (Solo) किंवा संघाच्या (Group) माध्यमातून सहभाग घेता येईल. एका संघात जास्तीत जास्त ८ सदस्य सहभागी होवू शकतील
३. रिल्स कालावधी किमान ६० सेकंद आणि कमाल १२० सेकंदापेक्षा अधिक नसावा
४. रिल्स मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेत सादर करता येईल.
५. रिल्समध्ये अश्लील, आक्षेपार्ह, अपमानास्पद, भेदभाव करणारे किंवा हिंसाचारास प्रोत्साहन देणारे कोणतेही दृश्य अथवा मजकुर वापरता येणार नाही.
६. रॅगिंगशी संबंधित प्रसंग सादर करताना कोणालाही प्रत्यक्ष त्रास, अपमान, मानसिक दबाव किंवा इजा होणार नाही याची पूर्ण दक्षता घ्यावी.
७. सादर करण्यात येणारी रिल्स स्वत: निर्मित (Original) केलेली असावी कॉपी केलेली अथवा इतरांच्या सामग्रीची नक्कल केलेली रिल्स किंवा स्पर्धेच्या नियमांचे उल्लंघन केलेले आढळल्यास संबंधित प्रवेशिका अपात्र ठरविण्यात येईल.
८. **तज्ञांनी परीक्षण करुन ठरवलेल्या प्रथम पाच क्रमांकांनाच प्रमाणपत्र व खालीलप्रमाणे रोख रक्कम बक्षिस म्हणून देण्यात येईल.**
प्रथम क्रमांक – रु. १,५००/–
द्वितीय क्रमांक – रु. १,३००/–
तृतीय क्रमांक – रु. १,०००/–
चतुर्थ क्रमांक – रु. ७००/–
पाचवा क्रमांक – रु. ५००/–
९. **सर्व सहभागी स्पर्धेकांना प्रमाणपत्र देण्यात येईल.**
१०. स्पर्धेत कोणत्याही शाखेचे विद्यार्थी सहभागी घेऊ शकतात.
११. स्पर्धेचा निकाल विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येईल.
१२. रिल्स स्पर्धेचे परीक्षण नियुक्त परीक्षकांकडून केले जाईल. परिक्षकांचा निर्णय अंतिम राहिल.